शेतीचा दर्जा दिल्याने मत्स्यव्यवसाय प्राधान्याचे क्षेत्र : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 2

उत्कृष्ट तलाठी म्हणून अमोल राठोड यांचा पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव >>पान 3

अखेर महामार्गावर 'तो' जीवघेणा खड्डा बुजविला >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
आपल्या निर्णयांवर ठाम राहा.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 16 ■ सोमवार, दि. 04 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



कन्नड अभिनेत्री शर्मीला मंद्रे साई चरणी नतमस्तक, आगामी चित्रपटाच्या यशासाठी केली प्रार्थना

आतील पान

# तंत्रज्ञानाच्या सहाय्याने महसूल विभाग अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** महसूल विभाग राज्याच्या आर्थिक विकासाचा कणा असून गतिमानता, पारदर्शकता व तत्परतेने सेवा देणारा विभाग म्हणून याची ओळख आहे. सध्या राज्यातील जनतेला सर्वाधिक ऑनलाइन सेवा उपलब्ध करून देणारा हा विभाग असून अधिक लोकाभिमुखतेसाठी महसूल परिषदेत अभ्यास गटांनी सादर केलेल्या शिफारशी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दिशादर्शक ठरतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूल परिषदेच्या समारोप प्रसंगी व्यक्त केला.



भारतीय प्रबंध संस्थान (आयआयएम) नागपूर, येथे आयोजित महसूल परिषदेच्या दुसऱ्या दिवशी झालेला चर्चासत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, जमाबंदी आयुक्त, नोंदणी महानिरीक्षक, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व महसूल विभागाशी संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कालानुरूप महसूल विषयक कार्यप्रणालीशी संबंधित धोरणात्मक बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली असून तंत्र कौशल्याच्या बळावर हा विभाग अधिकाधिक सक्षम व लोकस्नेही करण्याचा प्रयत्न राज्य शासनाकडून करण्यात येत आहे. या सर्व धोरणात्मक बाबींवर चर्चा, मंथन व मूल्यमापन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या महसूल परिषदेचा समारोप मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. या परिषदेत विभागीय आयुक्त प्रमुख असलेल्या समित्यांकडून विविध अहवाल सादर करण्यात आले. महसुली कामकाजात सुसूत्रता व गतिमानता आणण्यासाठी आवश्यक त्या बाबी त्यांनी मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिल्या. महसुली सेवा व योजनांच्या लाभांपासून एकही नागरिक वंचित राहू नये यासाठी अधिकाधिक सेवा ऑनलाईन पद्धतीने देण्यासोबतच त्यात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सादरीकरणाच्या माध्यमातून महत्वपूर्ण बाबी समितीकडून मांडण्यात आल्या. या विषयाचा शासनास सादर करण्यात येणारा अहवाल अचूक व निर्दोष असावा यासाठी प्रत्येक बाबींचा सखोल अभ्यास करण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

परिषदेतील विचारमंथन दिशादर्शक

दैनंदिन जीवनात सामान्य नागरिकांना विविध कामांच्या निमित्ताने वारंवार महसूल विभागाशी संपर्क साधावा लागतो. या परिषदेच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या धोरणात्मकबाबी केवळ जिल्हा मुख्यालय स्तरावरच नव्हे तर उपविभाग व तालुकास्तरावरही सर्वांसाठी अत्यंत उपयोगी सिद्ध होणार असल्याची भावना महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

या परिषदेच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कल्पना, विविध उपाययोजना व उपक्रमांच्या माहितीचे आदानप्रदान झाले असून यातून प्रशासनात नवी कार्यपद्धती अस्तित्वात येईल. तसेच ही परिषद विभागाच्या भविष्यातील वाटचालीसाठी दिशादर्शक ठरणार असल्याची भावना अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## 'वाशिम शेती शिल्प'चे चिया बियाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेट

### जिल्हाधिकारी बुवनेश्वरी यांचा उपक्रम शेतकऱ्यांसाठी नवा आत्मविश्वास

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मेहनतीचे आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनाचे प्रतीक ठरलेल्या 'वाशिम शेती शिल्प' या स्थानिक कृषी ब्रँडखाली उत्पादित चिया बियाण्यांचे नमुने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेट स्वरूपात सादर करण्यात आले. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी हा उपक्रम हाती घेत शेतकऱ्यांच्या उत्पादने राज्यस्तरावर पोहोचवण्याची दिशा दाखवली आहे.

जिल्हा कृषीप्रधान असून, इथल्या शेतकऱ्यांनी विविध पीक उत्पादनामध्ये आपली विशिष्ट ओळख निर्माण केली आहे. जिल्ह्यातील दर्जेदार शेतमालाला एक विशिष्ट ओळख देण्यासाठी 'वाशिम शेती शिल्प' हा ब्रँड विकसित करण्यात आला आहे. या अंतर्गत उत्पादित होणारी चिया बियाणे ही एक पोषणमूल्यांनी समृद्ध आणि बाजारात मागणी असलेली नगदी पीक मानली जाते.या भेटीद्वारे ना केवळ वाशिमच्या कृषी उत्पादनांना मान्यता मिळाली, तर शेतकऱ्यांच्या परिश्रमालाही शासनपातळीवर गौरव मिळाला. जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांपुढे हा उपक्रम मांडताना सांगितले की,



शेतकऱ्यांचे उत्पादन हे दर्जेदार असून, योग्य मार्केटिंग आणि शासनाची साथ मिळाल्यास त्यांचा आर्थिक स्तर उंचावता येईल.'वाशिम शेती शिल्प' या ब्रँडअंतर्गत पुढील काळात इतरही उत्पादनांना स्थानिक ओळख देत सस्टेनेबल मार्केट साखळी निर्माण केली जाणार आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील तरुण शेतकऱ्यांमध्येही नव्या प्रेरणेला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.मुख्यमंत्र्यांनीही जिल्हाधिकाऱ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

## पीक विमा योजनेत यंदा तब्बल ५० टक्के शेतकऱ्यांची घट; बोगसगिरीला लगाम लावण्याचा परिणाम

**मुंबई/प्रतिनिधी :** पीक विमा योजनेतील बोगसगिरी रोखण्यासाठी एक रुपयात विम्याची योजना बंद करीत सरकारने लागू केलेल्या नव्या योजनेकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली व त्यातून पीक विमा उतरविणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत तब्बल ५० टक्यांनी घटली आहे. त्यामुळे राज्य आणि केंद्र सरकारची मोठी आर्थिक बचत होणार असली तरी प्रामाणिक शेतकऱ्यांना पीकांचा विमा उतरविण्यास आणखी एक संधी म्हणून या योजनेला दोन आठवड्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

राज्यात गेली दोन वर्षे एक रुपयात पीक विमा योजना राबविण्यात आली होती. या योजनेत मोठ्याप्रमाणात बोगस शेतकऱ्यांनी बनावट दस्तावेज सादर करुन विमा उतरविले होते. त्यामुळे पीक विम्याच्या हप्त्यापोटी राज्य आणि केंद्र सरकारवर तब्बल ९ हजार कोटींचा आर्थिक बोजा पडला होता. एक रुपयात विमा योजनेत मोठ्याप्रमाणात घोटाळा आणि सरकारचीच फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर राज्य सरकारने ही योजना बंद करीत शेतकऱ्यांवर आर्थिक दायित्व टाकणारी आणि पीक कापणी प्रयोगाच्या आधारे नुकसान भरपाई देणारी नवी योजना यंदाच्या खरीप हंगामापासून लागू केली आहे. त्याचप्रमाणे पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक (फार्मर आयडी) बंधनकारक करण्यात आला असून हा क्रमांक आधार ओळखपत्राशी जोडण्यात आला आहे. त्यामुळे एका शेतकऱ्याची केवळ जिल्हा किंवा राज्यात नव्हे त देशभरात कुठे आणि किती शेतजमीन आहे याची माहिती शेतकरी ओळखपत्र क्रमांकाच्या माध्यमातून लगेच मिळते. तसेच शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के, रबी हंगामासाठी १.५ टक्के आणि दोन्ही हंगामातील नगदी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के एवढा हप्ता भरावा लागणार आहे.

## महाराष्ट्र नव्या राजकीय भूकंपाच्या उंबरठ्यावर?

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेनेमध्ये उभी फूट पडल्यापासून सर्वोच्च न्यायालयामध्ये सुरु असलेला शिवसेना पक्ष हे नाव आणि धनुष्यबाण या निवडणूक चिन्हासंदर्भातील वाद पुढील महिन्यामध्ये निकाला निघण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. न्यायालयात सुरु असलेल्या या प्रकरणासाठी १५ सप्टेंबरनंतर सुनावणीची अंतिम तारीख निश्चित होऊन शिवसेना नाव, पक्ष आणि झेंड्याच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे.

या निकालामध्ये नाव आणि पक्ष चिन्ह शिंदेंकडेच राहणार की ठाकरेंना मिळणार यावर शिक्कामोर्तब होईल. तीन वर्षांपासून सुरु असलेल्या या प्रकरणातील निर्णय कोणाच्या बाजूने जणार याची चर्चा होत असतानाच आता एक मोठा दावा करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना या प्रकरणात धक्कादायक निकालाचं तोंड पाहावं लागेल अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

प्रसिद्ध वकील असीम सरोदे



यांनी शिवसेनेसंदर्भातील वादावरुन केलेल्या वक्तव्याने राजकीय वतुळांमध्ये अनेकांच्या भूवया उंचावल्या आहेत. असीम सरोदे यांनी एकनाथ शिंदे यांची पक्ष म्हणून असलेली कारकीर्द महिनाभरात संपेल असा दावा सरोदेंनी केला आहे.

## धामणदरी येथील तरुणाची हत्या, ४ आरोपी अटक; चारही आरोपींना चार दिवसाची पोलीस कस्टडी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलढाणा :** दोन दिवसांपूर्वी सायंकाळ च्या सुमारास बुलढाणा शहरातील चिखली रोडवरील ग्रीन लीफ हॉटेल जवळ १९ वर्षीय सनी सुरेश जाधव रा.धामणदरी याची आरोपी देवराज माळी याने आपले इतर साथीदारासह येऊन चाकूने वार करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी बुलढाणा शहर ठाण्यात ६ आरोपी विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या आदेशाने शहर ठाणेदार रवी राठोड यांनी विविध पथके स्थापन करून काही तासांच्या आतच



मुख्य आरोपी देवराज माळी सह इतर तिघांना रात्री अटक केली आहे. प्रेम प्रकरणात ही हत्या करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अटक आरोपींना कोर्टात हजर केले असता चारही आरोपीना कोर्टाने चार दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली आहे.

# हनी ट्रॅप प्रकरणाची चौकशी कोणीही थांबवली नाही : मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** हनी ट्रॅप प्रकारांची चौकशी कोणीही थांबवली नाही. त्या प्रकारांची सत्यता बाहेर आली पाहिजे, एकमेकांच्या संदर्भात संशय नको. मुख्यमंत्री स्वतः त्यामध्ये लक्ष घालत आहे.या प्रकरणात आजी-माजी मंत्री किंवा कोणीही असो त्यांची चौकशी झाली पाहिजे, या प्रकरणामुळे खडसेंच्या जावईना अडकवण्यात आले असे नाही. कोणताही नवीन प्रश्नाला तर एखादा प्रश्न मागे राहत नाही. प्रक्रिया सुरू राहते या प्रकरणाची सखोल चौकशी होणार आहे. अशी माहिती राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की,नदीजोड प्रकल्पाचा फायदा हा सर्वांनाच होणार आहे. शेतकऱ्यांसाठी पाणी महत्त्वाच आहे. कायमस्वरूपासाठी हा पाण्याचा प्रश्न निकाली लागणार आहे. मालेगाव बॉम्ब ब्लास्ट प्रकरणात विरोधक जे टीका करत होते त्यांचा डाव फसला आहे. आता सध्या कोणता राजकारणाचा मुद्दा राहिला नाही ही फक्त टीका आहे.

पृथ्वीराज चव्हाण किंवा जितेंद्र आव्हाड हे जे बोलतात ते बिनबुडाचे आरोप आहेत. सनातनमुळेच धर्म टिकला आहे.निळवंडे धरण बांधला ३५ ते ४० वर्षे लागली, त्या वेळच्या राजकारणातून ते घडले. जे झालं ते झालं पण सध्या धरण झाले लोकांमध्ये समाधान आहे. रोहित पवार ट्वीट म्हणजे विरोधकांना काही शिल्लक राहिले नाही. रोहित पवारांकडे आता पुढचे कोणतेही काम नाही. मंत्री आणि आमदारांनी संयम बाळाला पाहिजे. लोकांच्या अपेक्षा जास्त आहेत. कार्यकर्त्यांच्या देखील नाराज असते.

माणिकराव कोकाटे माझे मित्र आहेत, त्यांचा स्वभाव नाशिककरांना माहिती आहे. माणिकराव यांच्या मनात काही नाही. बाहेरच्या लोकांना माणिकरावांचा स्वभाव माहित नाही म्हणून ते टीका करतात. संजय शिरसाट यांच्याबाबत मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.मंत्र्यांनी आचारसंहिता पाळली पाहिजे. मंत्री मंडळाची किंवा त्या खात्याची बदनामी होईल, असे कोणीही कृत्य करू नये, अशा सुचना मुख्यमंत्र्यांची आहे.

लोकाभिमुख सरकार आहे.त्या पद्धतीने सर्वांनी काम करण्याची गरज आहे. हनी ट्रॅप प्रकारांची चौकशी कोणीही थांबवली नाही. त्या प्रकारांची सत्यता



बाहेर आली पाहिजे, एकमेकांच्या संदर्भात संशय नको. मुख्यमंत्री स्वतः त्यामध्ये लक्ष घालत आहे.या प्रकरणात आजी-माजी मंत्री किंवा कोणीही असो त्यांची चौकशी झाली पाहिजे, या प्रकरणामुळे खडसेंच्या जावईना अडकवण्यात आले असे नाही. कोणताही नवीन प्रश्नाला तर एखादा प्रश्न मागे राहत नाही. प्रक्रिया सुरू राहते या प्रकरणाची सखोल चौकशी होणार आहे.माझा कोणावरही संशय नाही आणि माझ्यावरही कोणाचा संशय नाही. पाण्यावर भूमिपुत्रांचा पहिला अधिकार राहिला पाहिजे. निळवंडे धरणाच पाणी मुंबईला जाणार याचा फायदा होणार आहे. सरकारने देखील पाणी वापरकर्त्यांवर बंधन घातले पाहिजे. काही ठिकाणी उन्हाळ्यात पाणी पिण्यासाठी शिल्लक राहत नाही. असे मत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## भारताला डोळे दाखवलं पडलं महागात, फायनलनंतर रडला शाहिद आफ्रिदी, विराटच्या दोस्ताने २०० च्या स्ट्राईक रेटने धुतलं!

**मुंबई/प्रतिनिधी :** वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स स्पर्धेतील फायनल सामन्यापूर्वी पाकिस्तानचे माजी कर्णधार शाहिद आफ्रिदी यांनी भारतीय संघावर केलेल्या टीकेचा बदला दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज फलंदाज एबी डिव्हिलियर्सने अंतिम सामन्यात घेतला आहे. भारताच्या माघारीमुळे फायनलमध्ये पोहोचलेल्या पाकिस्तानला डिव्हिलियर्सने अक्षरश: एकहाती धुऊन काढलंय. आणि वर्ल्ड चॅम्पियन्स लीगची ट्रॉफी उंचावली आहे.

कोणत्या तोंडाने सेमीफायनल खेळणार?

फायनलच्या सामन्यापूर्वी शाहिद आफ्रिदीने भारतीय क्रिकेटपटूंनी लीग मॅच खेळण्यास नकार दिल्याबद्दल भारतावर जोरदार टीका केली होती. ''आता कोणत्या तोंडाने सेमीफायनल खेळणार?'' असं विधान करून आफ्रिदीने भारतीय संघाला डिवचलं होतं.

भारतीय संघाने मॅच न खेळताच स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे पाकिस्तानला थेट फायनलमध्ये आयता प्रवेश मिळाला. अशातच आता साउथ अफ्रिकेने पाकिस्तानला जागा दाखवली आहे.

## चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज जन्मदिन. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासह गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटासोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# शेतीचा दर्जा दिल्याने मत्स्यव्यवसाय प्राधान्याचे क्षेत्र : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मोर्शी येथील मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे भूमिपूजन

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** मत्स्य व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य शासन विविध प्रयत्न करीत आहेत. यातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे शासनाने मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा दिला आहे. हा दर्जा बहाल केल्यामुळे मत्स्य शेती करणाऱ्यांना कर्ज, किसान क्रेडिट आणि अनुषंगिक बाबी प्राधान्याने मिळण्यास मदत झाली आहे. यामुळे मत्स्य व्यवसाय आज प्राधान्याचे क्षेत्र झाले आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. मोर्शी येथे आज महाराष्ट्रातील चौथे आणि पश्चिम विदर्भातील पहिल्या मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे भूमिपूजन पार पडले.



यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मत्स्यव्यवसाय तथा बंदरे मंत्री नितेश राणे, खासदार अनिल बोंडे, आमदार प्रताप अडसड, केवलराम काळे, उमेश यावलकर, राजेश वानखेडे, प्रवीण तायडे, चैनसुख संचेती, रामदास तडस, नवनीत राणा, पशुसंवर्धन दुग्ध व मत्स्यव्यवसाय विकास विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., महाराष्ट्र पशु मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, कार्यकारणी सदस्य अनुराधा चव्हाण आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात मत्स्य व्यवसायाला चालना मिळावी यासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहेत. समुद्रातील मासेमारी व्यवसायावर लक्ष केंद्रित असले तरी आज ४० टक्के मत्स्य व्यवसाय गोड्या पाण्यावरील व्यवसायामधून होतो. यात वाढ करण्यासाठी या क्षेत्राला सर्वतोपरी मदत केली जाईल. शासनाच्या मदतीने शेतकऱ्यांनी शेततळ्यांमध्ये शेतीच्या सिंचनासह मत्स्य व्यवसाय सुरू केल्याने त्यांना अडचणीच्या काळात मदत झाली आहे. तसेच रोजगाराची संधीही निर्माण झाली आहेत. शेतकऱ्याचे जीवनमान उंचावे यासाठी आपदग्रस्त परिस्थितीमध्ये मदत करण्याचे धोरण ठरवले आहे. शेतीसाठी प्रामुख्याने सिंचन व्यवस्था उभारण्यासाठी प्रकल्प मार्गी लावण्यात येत आहे. विदर्भाची भाग्यरेखा ठरणाऱ्या वैनगंगा – नळगंगा या साडेपाचशे किलोमीटरच्या योजनेमुळे गोसेखुर्दचे पाणी बुलढाणापर्यंत जाणार आहे. यात ३१ धरणे भरणार असून एक लाख कोटी रुपयांचा खर्च या प्रकल्पावर करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना मदतीसोबतच शेतीमध्ये गुंतवणूक करणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक वर्षात पाच हजार कोटी याप्रमाणे पाच वर्षात २५ हजार कोटीची गुंतवणूक केली जाईल. शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी महत्त्वाची असली तरी अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशीनुसार उपाययोजना करण्यात येणार आहे. त्यासोबतच शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या सर्व सुविधा नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेतून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा बारा तास वीज उपलब्ध व्हावी, यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा प्रायोगिक प्रकल्प मोर्शीमध्येच राबविण्यात आला आहे. पालकमंत्री बावनकुळे यांनी मत्स्य विज्ञान महाविद्यालय मोर्शी येथे होणे हा अभिमानाचा क्षण आहे. मुख्यमंत्र्यांनी विकसित महाराष्ट्राचे धोरण ठरविले असून या दिव्यांग, शेतकरी, शेतमजूर अशा सर्वच घटकांना न्याय देण्याचे धोरण आखले आहे. दिव्यांगांना अडीच हजार रुपये महिना मदत देण्यात येत आहे, तर कर्जमुक्तीची गरज असलेल्यांना मदत करण्यासाठी समिती स्थापन करून विविध निर्णय घेण्यात येणार आहे. प्रत्येक शेतीमध्ये जाण्यासाठी पानंद रस्ता तयार करण्यात येऊन शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल बाजारपेठेत पोहोचावा, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच येत्या काळात चिखलदरा परिसराला पर्यटनाचा केंद्रबिंदू ठरवून विकास करण्यात येणार आहे. त्यासोबतच मोर्शी परिसरातील संत्र्यावरील प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यात येणार आहे.तसेच यावेळी राणे यांनी मार्गदऱ्शन केले.खासदार अनिल बोंडे यांनी प्रास्ताविकातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन करून कोनशिलेचे अनावरण केले. यावेळी भोई समाजातर्फे मुख्यमंत्र्यांचा पुष्पहाराने सत्कार करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील पाच रस्ते विकास कामांचे लोकार्पण करण्यात आले. क्षिप्रा मानकर यांनी सुत्रसंचालन केले. कुलगुरु डॉ. पाटील यांनी आभार मानले.

# मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते स्तनपान सप्ताहाचे उद्घाटन

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते काल जागतिक स्तनपान सप्ताहाचे ( ) उद्घाटन प्राथमिक आरोग्य केंद्र तुप्पा येते करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी मार्गदर्शन करताना स्तनपानाचे महत्त्व अधोरेखित केले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला आरोग्य विभागाच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दीप प्रज्वलन करून सप्ताहाचे उद्घाटन केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात सुपोषित बाळ पुरस्कार देण्यात येणार आहे. आपल्या मार्गदर्शनात, मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाल्या की, ‘‘आईचे दूध हे बाळासाठी अमृतसमान आहे. पहिल्या सहा महिन्यांत बाळाला केवळ आणि केवळ स्तनपान देणे आवश्यक आहे. यामुळे बाळाची रोगप्रतिकारशक्ती वाढते, बाळ निरोगी राहते आणि आई व बाळ यांच्यात भावनिक नाते अधिक दृढ होते.‘‘

याप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. संगीता देशमुख यांनी आरोग्य कर्मचारी,आशा सेविका आरोग्य विभाग आणि अंगणवाडी सेविकांना स्तनपानाबद्दल समाजात जनजागृती करण्याचे आवाहन केले. तसेच, गरोदर मातांना आणि स्तनदा मातांना योग्य आहार, स्वच्छता आणि स्तनपानाचे फायदे याबद्दल माहिती देण्यावर भर देण्यास सांगितले.

हा सप्ताह १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट पर्यंत चालणार असून, या काळात विविध ठिकाणी स्तनपानाचे महत्त्व विशद करणारे कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. तसेच आयटी बॉम्बे मधे प्रशिक्षण दिलेल्या प्रशिक्षणार्थीने कार्यक्रमाला हजर असलेल्या सर्वांना स्तनपान या विषयाचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

आयटी बॉम्बेने जे प्रशिक्षण दिले ते प्रशिक्षण जिल्ह्यातील सर्व स्तनदा माता व गरोदर मातांना प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करावे असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कवले यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना दिले.

कार्यक्षेत्रातील बाळंतपण सरकारी दवाखान्यात व्हाव्यात यासाठी समाजात जनजागृती करावी व शासकीय संस्थेमध्ये प्रसूतीचे प्रमाण वाढवावे असे सूचना दिल्या.

या कार्यक्रमाला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख , महिला व बालविकास अधिकारी प्रशांत थोरात , सह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रवीण मुंडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी राठोड, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी रेणुका दराडे, वैशाली बेरलीकर, प्रा. आ केंद्रातील अधिकारी व कर्मचारी,अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, आशा सेविका आणि स्तनदा माता मोठ्या संख्येने माता उपस्थित होत्या.

## भाजपाच्या दोन आमदारांनी यवतमध्ये दंगल पेटवली; संजय राऊतांचा गंभीर आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** स्वत:ला नव हिंदुत्ववादी समजणाऱ्या भाजपाच्या दोन आमदारांनी दौंडच्या यवतमध्ये दंगल पेटवली, असा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी रविवारी केला. ’’दौंडमध्ये हिंसाचार करणारे अर्बन नक्षलवादी भाजपाचेच होते. भाजपाचे दोन आमदार, जे स्वत:ला नव हिंदुत्ववादी समजतात, ते यवतमध्ये येतात आणि दंगल पेटवून जातात, अशा वेळी फडणवीसांचा जनसुरक्षा कायदा काय करतो आहे? देवेंद्र फडणवीस हे अपयशी मुख्यमंत्री आहेत. जशी नरेंद्र मोदींच्या फुग्यात हवा भरली आहे, तशी महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या फुग्यातही हवा भरलेली आहे’’, असा हल्लाबोल संजय राऊतांनी केला. संजय राऊत यांनी मुंबईत माध्यमांशी संवाद साधलाय, त्यावेळी ते बोलत होते.

आता फडणवीसांनी खोक्याची भाषा करू नये : काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या भाजपा प्रवेशावरही संजय राऊतांनी टीका केली. ते म्हणाले, कैलास गोरंट्याल यांनी काँग्रेसमध्ये असताना विधान भवनाच्या पायऱ्यांवर ’पन्नास खोके, एकदम ओके’ ही घोषणा दिली, ती जगभर पोहोचली. आता ते देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षात गेले आहेत. ते काल म्हणाले, यंदाची विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी एकेका मतदारसंघात १०० कोटी रुपये खर्च केले गेले. सरकारी वाहनं, पोलिसांच्या वाहनातून पैशांचं वाटप झालं. आमच्यासारखे कार्यकर्ते याला कुठे पुरे पडणार. त्यामुळे मला भाजपामध्ये यावं लागलं, असं ते म्हणाले. त्यामुळे फडणवीसांनी खोक्याची भाषा करू नये’’, अशी टीकाही संजय राऊतांनी केली.

राहुल गांधींच्या प्रश्नांची उत्तरं द्या : लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतचोरीविषयी राहुल गांधी आणि त्यांची टीम अभ्यास करीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेच्या १०० जागांवर कशा प्रकारे हेराफेरी केली, हे राहुल गांधी वारंवार सांगत आहेत. निवडणूक आयोग या सगळ्यात सहभागी आहे. या १०० जागांवर घोटाळा झाला नसता, तर आज मोदी पंतप्रधान नसते. महाराष्ट्र आणि हरियाणाच्या निवडणुकीत हेच झालं. आता बिहारच्या निवडणुकीतही तेच होणार आहे. राहुल गांधी कधीच पुराव्यांशिवाय बोलत नाहीत. देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर बोलायला हवे. त्यांच्या भ्रष्ट मंत्रिमंडळात जी खोक्यांची ओढाताण सुरू आहे, त्यावर बोललं पाहिजे. शेतकऱ्यांच्या आत्म हत्यांवर बोललं पाहिजे. उद्धव ठाकरेंमध्ये ते किती काळ अडकून पडणार? उद्धव–राज एकत्र आल्याच्या धक्क्यातून फडणवीस सावरलेले नाहीत, असा टोलाही संजय राऊत यांनी लगावला.

मराठीसाठी आम्ही हिंसाचार करणार : मनसैनिकांकडून सुरू असलेल्या तोडफफोडीविषयी विचारले असता संजय राऊत म्हणाले की, मराठी भाषेसाठी आम्ही हिंसाचार करणार आहोत. तुम्हाला काय करायचं ते करा. देवेंद्र फडणवीस हा महाराष्ट्र आहे, हे मराठी माणसांचं राज्य आहे. आमच्या १०६ हुतात्म्यांनी महाराष्ट्रासाठी बलिदान दिलं.


## कन्नड अभिनेत्री शर्मीला मंद्रे साई चरणी नतमस्तक, आगामी चित्रपटाच्या यशासाठी केली प्रार्थना

**शिर्डी/प्रतिनिधी :** कन्नड चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री शर्मीला मंद्रे शिर्डीतील साई चरणी नतमस्तक झाली आहे. ती साईबाबाच्या दर्शनासाठी शिर्डीमध्ये गेली आहे. आता तिचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये ती आपल्या भावना व्यक्त करत आहे. या व्हिडिओमध्ये तिनं साईबाबांबद्दलच्या भावना व्यक्त केल्या आहेत. व्हिडिओत तिनं म्हटलं, ‘‘न चुकता दरवर्षी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येत असते. साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन मनाला एक समाधान आणि शांती मिळते. आज साईबाबांच्या धूपारतीला उपस्थिती राहण्याचा योग आल्यानं खूप चांगलं वाटत आहे.‘‘

कन्नड चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री शर्मीला मंद्रे हिनं आज शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतल्यानंतर तिनं माध्यामाबरोबर संवाद साधला होता. शर्मीला मंद्रेनं साईबाबांच्या धूपारतीलाही हजेरी लावली आहे. आगामी येणारा डेविल हा कन्नड चित्रपट विविध भाषांमध्ये प्रदर्शित होणार असून यावर्षी अखेर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. डेविल या चित्रपटात कन्नड सुपरस्टार दर्शनही प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. तसेच या चित्रपटात अभिनेत्री शर्मीला मंद्रे ही मुख्य भूमिकेत दिसणार असून चित्रपटाच्या यशासाठी आज साईबाबांच्या चरणी प्रार्थना केली असल्याचंही शर्मीलानं साईदर्शनानंतर माध्यमांशी बोलताना सांगितलं आहे.

# अकलूजमध्ये आपदा मित्र/सखींसाठी शोध व बचाव प्रशिक्षण

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत रायगड येथे आपदा मित्र/सखी प्रशिक्षण पूर्ण करून परतलेल्या स्वयंसेवकांसोबत अकलूज नगरपरिषद कर्मचारी यांचा संयुक्त शोध व बचाव कार्याचा सराव अभ्यास शनिवार, दि. २ ऑगस्ट व रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता. हे प्रशिक्षण अकलूज नगरपालिका मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या सहकार्याने, तर निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्या निर्देशानुसार घेण्यात आले, अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी दिली.





सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत आयोजित या उपक्रमात आपत्ती व्यवस्थापन अधिकारी आणि सोलापूर रेस्क्यू स्काडचे प्रशिक्षित स्वयसेवक अनिल सल्ले यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणामध्ये जलप्रलय, इमारत कोसळणे, आग लागणे अशा विविध आपत्ती परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्याच्या तंत्रांचा सराव करण्यात आला.

आपदा मित्र/सखी आणि नगरपरिषद कर्मचारी यांना प्राथमिक उपचार, शोध व बचाव उपकरणांचा वापर, सुरक्षिततेची काळजी, तसेच समन्वयात्मक कार्यपद्धती याचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमामुळे अकलूज शहरातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम होणार असून, भविष्यातील संकटांना तोंड देण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे.

सदर प्रशिक्षणामुळे आपदा मित्र/सखींचा आत्मविश्वास वाढला असून, त्यांनी सामाजिक उत्तरदायित्वाची भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडण्याची तयारी दर्शवली आहे, असे श्री. ढोले यांनी सांगितले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# उत्कृष्ट तलाठी म्हणून अमोल राठोड यांचा पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** येथील तलाठी अमोल राठोड यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल नुकताच पालकमंत्री मकरंद पाटील व जिल्हाधिकारी किरण पाटील व पोलीस अधीक्षक तांबे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. डोणगाव येथील तलाठी अमोल राठोड हे २००९ पासून तलाठी म्हणून कार्यरत असून त्यांनी आपल्या कार्यकाळात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून समृद्ध बनवण्याचे काम केले आहे.त्याचबरोबर शासनाच्या विविध योजना पारदर्शकपणे राबवून त्याचा शेतकऱ्यांना फायदा करून दिला आहे. त्याचबरोबर शासनाचा उद्देशही सफल केला आहे.विविध ठिकाणी त्यांनी नोकरीच्या काळात उत्कृष्ट सेवा बजावली आहे. नुकसानग्रस्त अतिवृष्टी काळात शेतकऱ्यांना भेटी देऊन आधार देण्याबरोबरच शासनाचा मार्गदर्शक सुचनाचे पालन करून विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविला आहे. त्याचबरोबर इतर प्रशासकीय कार्यातही अमोल राठोड हे कर्तव्य दक्ष राहून काम करीत असल्याने त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना उत्कृष्ट तलाठी म्हणून गौरविण्यात आले आहे व वेळेच्या आत काम करण्याचा हातखंडा असल्याने त्यांची शेतकऱ्यांमध्ये व प्रशासनामध्ये उत्कृष्ट तलाठी म्हणून ओळख आहे. तलाठी अमोल राठोड यांनी आपल्या सेवेत केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत जिल्हा प्रशासनाच्या वतीने त्याचबरोबर महसूल विभागाच्या वतीने बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील, जिल्हाधिकारी किरण पाटील,जिल्हा पोलीस अधीक्षक तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्कृष्ट कार्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला आहे. तलाठी अमोल राठोड यांच्या जिल्हा प्रशासनाच्या वतीने उत्कृष्ट तलाठी म्हणून गौरव केल्याबद्दल तलाठी अमोल राठोड यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.तर, झालेल्या गौरवाबाबत बोलताना तलाठी अमोल राठोड यांनी आपल्या कामाची दखल



जिल्हा प्रशासनाने घेतली असून निष्ठेने काम केल्याची पावती असल्याचे सांगितले आहे.

## संक्षिप्त...

### रिक्षा आणि बाईकची समोरासमोर धडक

**भिवंडी/प्रतिनिधी :** रिक्षा आणि केटीएम बाइकची समोरासमोर धडक झाल्याची घटना शांतीनगर पाईपलाईन रोड येथे घडली. सदर घटनेत बाईक चालक मोहम्मद आरिफ व पाठीमागे बसलेला समीर अपघातामध्ये गंभीर जखमी झाला आहे. तसेच रिक्षामध्ये बसलेला मोहपूज खान हा ही गंभीर जखमी झाला असल्याची माहिती आहे. या अपघातामध्ये तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. तिघांना ठाणा येथे रेफर करण्यात आले आहे. रिक्षा मधील दोन जण किरकोळ जखमी, त्यातील एकाला उपजिल्हा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून अधिक तपास पोलीस करत आहे.

### ज्ञानेश्वरी मुंडे यांची एसआयटी अधिकाऱ्यांकडे मागणी; तात्काळ आरोपींना अटक करा आणि आमच्या परिवाराला न्याय द्या



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरनी एसआयटी स्थापन केली आहे. मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी फडणवीस यांच्याकडे यासाठी स्थापन करण्याची मागणी केली होती. यासाठी पथकामध्ये त्यांनी आयपीएस पंकज कुमावत यांच्यासह दोन अधिकाऱ्यांची नावे दिली होती. त्या अधिकाऱ्यांना या पथकात घेण्यात यावे, अशी मागणी केली होती. आणि या मागणीची पूर्तता फडणवीस यांनी केली असून आता आयपीएस पंकज कुमावत या प्रकरणाचा तपास करत आहेत. दरम्यान, ज्ञानेश्वरी मुंडे यांनी यासाठी अधिकारी पंकज कुमावत यांच्याकडे एक मागणी केली आहे, की तात्काळ आरोपींना अटक करा आणि आमच्या कुटुंबाला न्याय द्या.

### उबाठा गटाचे माजी नगरसेवक रामदास कांबळे यांचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिकेतील सायन कोळीवाडा विभागातील प्रभाग क्रमांक १७३ मधील उबाठा गटाचे माजी नगरसेवक रामदास कांबळे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आज शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासह, शाखा संघटीका नंदा बापू शाहू, उपशाखा संघटीका नंदा पाटसुभे, सुचित्रा कावळे, दीपिका नेमन, श्वेताली खेडपकर, देविका नायर आणि सर्व पदाधिकारी यांचाही पक्षप्रवेश झाला. यासोबत रेखा तिवारी, मालन सावंत, लक्ष्मी कोतवाल, अनिता सावंत, अपूर्वा पालव, युवासेना अधिकारी सचिन पडवळ, सहार येले, विनोद शर्मा यांनीही शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला. यावेळी माजी खासदार राहुल शेवाळे, माजी शिक्षण समिती सभापती मंगेश सातमकर, शिवसेना सचिव राम रेपाळे, शिवसेना सचिव संजय मोरे तसेच शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.

### मनोज जरांगे पाटील आत असलेली लिफ्ट आदळली; सुदैवानं कोणतीही दुखापत नाही





दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी बीड मधील एका खाजगी रुग्णालयात दाखल होते. आणि याचं रुग्णाला भेटण्यासाठी जरांगे पाटील रुग्णालयात आले होते. तळमजल्यावरून पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी जरांगे पाटील यांच्यासह त्यांचे सहकारी लिफ्ट मध्ये गेले. परंतु लिफ्ट मध्ये क्षमतेपेक्षा अधिक लोक आल्याने लिफ्ट ओव्हरलोड झाली. आणि त्यामुळे ही लिफ्ट पहिल्या मजल्यावरून तळमजल्यावर कोसळली. या घटनेने रुग्णालय परिसरात खळबळ उडाली असून, सुदैवानं जरांगे पाटील यांच्यासह कुणालाही दुखापत झालेली नाही.

## मित्रांनी केला मित्राचा घात, बाकाचा वाद बेतला जीवावर; अल्पवयीन गुन्हेगारीचा प्रश्न पुन्हा गंभीर

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकच्या सातपूर परिसरात एका खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या वादात एका अल्पवयीन मुलाचा मृत्यू झाला आहे. बाकावर बसण्याच्या वादातून हाणामारीत एकाची हत्या करण्यात आलीय. दहावीत शिकणाऱ्या मित्रांनीच त्याच्या एका मित्राला लाथा बुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

शाळेतील वाद खाजगी क्लास पर्यंत पोहोचला आणि त्यानंतर दोन दिवसांपूर्वी झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारी झाले. तीन ते चार मित्रांनी त्यांच्याच मित्राला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. एक १६ वर्षीय शाळकरी







मुलगा मृत्युमुखी पडला आहे. नाशिकच्या सातपूर पोलीस ठाण्यात याप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला यात दोन विधी संघर्षीत बालकांना देखील ताब्यात घेतले आहे.

मित्रांमधला वाद हा शाळेपासून खाजगी क्लासेस पर्यंत देखील पोहोचला मात्र या वादाकडे ना पालकांनी लक्ष दिलं ना संबंधित शिक्षकांनी मात्र घटनेनंतर मयत मुलाच्या कुटुंबाकडून खाजगी शिकवणीच्या संस्था मोठ्या प्रमाणात फी घेतात मात्र विद्यार्थ्यांना योग्य सुविधा उपलब्ध होत नाही किंवा मुलांकडे देखील फारसं लक्ष दिलं जात नाही असं मयत मुलाच्या कुटुंबाचे म्हणणे आहे. घटनेतील संबंधित विद्यार्थ्यांना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी मयत मुलाच्या कुटुंबाची मागणी आहे.

नाशिकचा सातपूर परिसर हा कामगार वस्तीचा परिसर आहे मात्र या परिसरात अनेक दिवसांपासून गुन्हेगारीने उच्चांक गाठला आहे. ज्या खाजगी क्लासच्या बाहेर हा प्रकार घडला.

नाशिक शहर पोलीस आयुक्तांकडून शहरातील वाढत्या गुन्हेगारीमुळे पोलीस आपल्या दारी हा उपक्रम देखील घेण्यात आला मात्र शहरातील गुन्हेगारी ही थांबण्याचे नाव घेत नाही. शहरातील गुन्हेगारीत सर्वाधिक घटना या अल्पवयीन गुन्हेगारांच्या समोर येत आहेत. त्यामुळे रागावर नियंत्रण मिळवणे आणि टोकाचे पाऊल उचलणे या घटनांमुळे अल्पवयीन गुन्हेगारीचा प्रश्न गंभीरहोतचाललाआहे.

## दिल्लीत क्रांतीसिंह नाना पाटील जयंती साजरी

नवी दिल्ली : स्वातंत्र्यसंग्रामातील महान सेनानी, 'परदेशी नव्हे, स्वराज्य हवे' या विचारांचा पुरस्कार करणारे क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. कोपर्निकस मार्ग येथील महाराष्ट्र सदनाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात वरिष्ठ सहायक कक्ष अधिकारी सारिका शेलार यांच्यासह उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये भीषण अपघात, क्रेटा कारने पायी जाणाऱ्यांना चिरडले, दोघांचा जागेवरच मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** काळी मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या दोघांना भरधाव आलेल्या क्रेटा कारने भर रस्त्यात चिरडलं. या दुर्घटनेत दोघांचा जागीच मृत्यू झाला असून, परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. छत्रपती संभाजीनगरमधील खुलताबाद तालुक्यातील नंद्राबादे परिसरात आज (३ ऑगस्ट) सकाळी हा भीषण अपघात घडला.

या अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे अशोक यादवराव घुसळे आणि ज्ञानेश्वर राधाकृष्ण जाधव अशी आहेत. हे दोघेही सकाळी रोजच्या प्रमाणे चालण्यासाठी बाहेर पडले होते.

नेमकं घडलं काय?

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यात सकाळच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. खुलताबाद येथील नंद्राबादे गावाजवळील रस्त्यावर मर्निंग वॉकसाठी गेलेल्या दोघांना भरधाव वेगात येणाऱ्या क्रेटा कारने जोरदार धडक दिली. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला.मृत्यू झालेल्यांची नावे अशोक यादवराव घुसळे आणि ज्ञानेश्वर राधाकृष्ण जाधव अशी आहेत. अपघातानंतर क्रेटा कारचा चालक घटनास्थळावरून गाडी घेऊन फरार झाला. घटनेनंतर ग्रामीण वाहतूकं पोलिसांनी तत्काळ नाकाबंदी करत पाठलाग सुरू केला. काही तासांत क्रेटा कार म्हैसमाळ रोडवरील जरबक्ष उर्स मैदानाजवळ सापडली. वाहन चालकाला आणि त्याच्या पत्नीला ताब्यात घेण्यात आलं. प्राथमिक तपासानुसार आरोपी वाहनचालक सैन्यातील असल्याची माहिती समोर आली आहे.

रक्ताने माखलेली क्रेटा कार खुलताबाद पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली असून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. घटनास्थळी एकच खळबळ उडाली असून, गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.हे दोघेही सकाळी रोजच्या प्रमाणे चालण्यासाठी बाहेर पडले होते. मात्र, नंद्राबादे परिसरात भरधाव वेगाने येणाऱ्या क्रेटा कारने त्यांना चिरडले. अपघात इतका भीषण होता की दोघांचा जागीच मृत्यू झाला.

वाहन चालवणारा व्यक्ती सैनिकी सेवेत असल्याची माहिती

प्राथमिक माहितीनुसार, वाहन चालवणारा व्यक्ती सैनिकी सेवेत असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांकडून अद्याप त्याची अधिकृत ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. अपघात झालेल्या क्रेटा कारवर मोठ्या प्रमाणावर रक्ताचे डाग दिसून आले असून, सदर वाहन खुलताबाद पोलिस ठाण्यात जमा करण्यात आलं आहे. अपघातामुळे स्थानिक नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे. घटनेनंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. खुलताबाद पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली असून, सध्या पुढील तपास सुरू आहे.



## रत्नागिरीच्या राजाचे दणक्यात आगमन, राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांची आगमन सोहळ्यामध्ये उपस्थिती





**रत्नागिरी/प्रतिनिधी :** संपूर्ण रत्नागिरीकरांची ओढ असलेला रत्नागिरीच्या राजाचे आज मोठ्या जल्लोषात रत्नागिरीकरांनी मिरवणुकीद्वारे जल्लोषात स्वागत केले. रत्नागिरीतील साळवी स्टॉप येथून मारुती मंदिर सर्कल पर्यंत या मिरवणूक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने रत्नागिरीकर मोठ्या भक्तीभावामध्ये, उत्साहाने सहभागी झाल्याचे चित्र दिसून आले. या आगमन सोहळ्याला राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत हे शेवटपर्यंत उपस्थित होते. ढोल ताशांचा गजर, पारंपारिक वाद्य, डीजेच्या तालावर व फटाक्यांच्या आतषबाजी मध्ये रत्नागिरीच्या राजाचे दमदार स्वागत करण्यात आले. मोठ्या संख्येने तरुणाई या आगमन सोहळ्यामध्ये सहभागी झाल्याचे दिसून आले. रत्नागिरीच्या मारुती मंदिर सर्कलमध्ये रत्नागिरीचा राजा विराजमान होणार आहे.


### महादेवी हत्तीणीला 'वनतारा'त नेल्याचा रिलायन्सला फटका

**कोल्हापूर /प्रतिनिधी :** कोल्हापूरच्या शिरोळमधील नांदणी या गावातील जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी मठातील महादेवी (माधुरी) या हत्तीणीला गुजरातच्या जामनगर येथील 'वनतारा' या पशुसंवर्धन केंद्रात नेण्यात आलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार ही कार्यवाही करण्यात आली आहे. मात्र, हत्तीणीला नेल्यामुळे कोल्हापूरकर मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त करत आहेत. त्याविरोधात तीव्र जनभावना निर्माण होत असून अनेक गावांमध्ये आंदोलने केली जात आहेत.

## खामगावात जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन

### खव्वयांना चाखायला मिळणार नैसर्गिक भाज्यांची चव

दैनिक आपला विदर्भ









**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) कृषी विज्ञान केंद्र जळगाव जामोद व सामाजिक संस्थेच्या वतीने खामगाव येथील महात्मा गांधी सभागृहात जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या रानभाजी महोत्सवामध्ये खव्वयांना विषमुक्त भाज्यांची चव चाखायला मिळणार आहे. बुलढाणा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) कृषी विज्ञान केंद्र जळगाव जामोद व सामाजिक संस्थेच्या वतीने खामगाव येथील महात्मा गांधी सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवामध्ये शेतकरी गटामार्फत कटरोली (करूटले), आधाडा, पाथरी, घोळ, तांदळजीरा, कुर्डू ,गुळवेल, शेवगा, तरोटा, फांग अशा विविध रानभाज्या व रानभाज्यांपासून तयार करण्यात आलेले खाद्यपपदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते. जेणे करून नागरीकांसाठी रानभाजी विषयी माहिती मिळावी व त्यांना सहज उपलब्ध व्हायला हवी या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या रानभाजी महोत्सवाने नागरिकांना विषमुक्त भाज्या चाखायला मिळणार आहेत. तसेच दुर्मिळ होत चाललेल्या भाज्या सुद्धा मिळणार आहेत. या रानभाजी महोत्सवात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक अलोक सकळकळे,जळगाव जामोद कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विकास जाधव यांनी केले आहे. तर सदर रानभाजी महोत्सवाच्या आयोजनाबद्दल ग्राहक नीता सावजी यांनी आनंद व्यक्त करीत सदर रानभाजी महोत्सवात मिळालेल्या रानभाज्यांबद्दल समाधान व्यक्त करीत शासनाने विषमुक्त भाजीपाला उत्पादनाला चालना द्यावी, अशी मागणी केली आहे.

# अखेर महामार्गावर 'तो' जीवघेणा खड्डा बुजविला

**डोणगाव/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर ते मुंबई महामार्गावर जीवघेणा खड्डा पडल्यामुळे वाहनधारकांचे अपघात घडत आहेत. सदर खड्ड्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने वाहनधारकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत होता.याबाबत दैनिक आपला विदर्भने वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. सदर वृत्ताची दखल घेत तो जिवघेणा खड्डा बुजविण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर महामार्गावर डोणगाव जवळ भलामोठा खड्डा पडल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत होता.सदर मार्ग हा महामार्ग असल्याने या महामार्गावरील वाहने हे भरधाव वेगाने असतात. भरधाव असणाऱ्या वाहनचालकांला सदर खड्डा जवळ येईपर्यंत दिसत नसल्याने या खड्ड्यात वाहन आदळून मोठे अपघात घडत होते. तसेच दुचाकीधारकांचे सुद्धा या खड्ड्यामुळे अनेक अपघात घडले आहेत. खड्ड्यांमुळे वाढलेले अपघात कमी करण्यासाठी सदर खड्डा तात्काळ बुजवावा,अशी मागणी होत होती. काही सुज्ञ नागरिकांना सदर खड्ड्यामुळे अपघात होऊ नये,यासाठी खड्ड्यामध्ये लाकूड रोवून वाहनधारकांना सतर्क केले जात आहे. छत्रपती संभाजीनगर ते मुंबई महामार्गावर असल्याने या मार्गावरून रुग्ण तसेच अधिकारी, पदाधिकारी तसेच इतर नागरिकांना छत्रपती संभाजीनगर, मुंबई, जालना आदी ठिकाणी जावे लागते. रात्रीच्या वेळेस सदर वाहनधारकांना जावे लागते.भरधाव वाहनचालकांना सदर खड्डा जवळ येईपर्यंत दिसत नसल्याने या खड्ड्यात वाहन आदळून अपघात घडत होते. दुचाकीधारकांचे या खड्ड्यामुळे अनेक अपघात घडले होते. तसेच दरदिवशी दुचाकीधारक व कार यासह इतर वाहनांचे अपघात घडत आहेत. प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष असल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात होता.प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी संबंधीत विभागाने याकडे लक्ष देऊन या मार्गावरील हा जीवघेणा खड्डा तात्काळ बुजवावा,यासाठी दैनिक आपला विदर्भने वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. सदर वृत्ताची दखल घेत ३ ऑगस्ट रोजी सदर खड्डा बुजविण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांसह वाहन धारकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## आपला विदर्भ IMPACT


### राज्य महामार्गावरील खड्ड्यात धानाची लागवड
छत्रपती संभाजी नगर ते नागपूर राज्य महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य : युवकाने वेधले प्रशासनाचे लक्ष

दैनिक आपला विदर्भ

डोणगाव/प्रतिनिधी : छत्रपती संभाजी नगर ते नागपूर राज्य महामार्गावर डोणगाव जवळ प्रचंड मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे दर दिवशी दुचाकी वाहनास मोठ्या विहनांचा अपघात घडत आहेत. खड्ड्यांमुळे अनेकांना अपंगत्व आले आहे.मात्र, गेंड्याची कातडी असलेल्या प्रशासन याकडे लक्ष देण्यास तयार नसल्याने शासनाचे व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी एका युवकांने रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यात धान लागवड करून शासनाचा निषेध केला.प्रशासनाचा निषेध केला. या युवकाच्या या आगळ्या वेगळ्या आंदोलनाने शासन प्रशासनाचे लक्तरे विशीवर टांगल्या गेली आहेत.
डोणगाव येथून छत्रपती संभाजी नगर व नागपूर राष्ट्रीय महामार्ग गेलेला आहे.डोणगाव परिसर सदर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने परिसरात प्रचंड मोठे विविध खड्डे पडले आहेत.या खड्ड्यांमध्ये दुचाकी सह इतर मोठ्या वाहनांचे आदळून दर दिवशी अपघात घडत आहेत.
अनेकांना या खड्ड्यामुळे अपघात होऊन अपंगत्व आले आहे. महामार्गावरील खड्डे बुजवण्यासाठी वारंवार मागणी करण्यात आली.मात्र, शासन प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे परिणामी प्रवाशांना आपला जीव मोठे घेऊन प्रवास करावा लागत आहे. गत चार ते पाच दिवसापासून सुरू असलेल्या संततदार पावसाने खड्ड्यामध्ये पाणी साचून राहत आहे. त्यामुळे वाहनधारकाला खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने अनेक वाहने खड्ड्यांमध्ये जाऊन पडत अपघात घडत आहेत. महामार्गावरील खड्ड्यात दुचाकी आढळल्याने अनेकांना दुखापत झाली आहे. मात्र, निगरगट्टा प्रशासन लक्ष देण्यास तयार नसल्याने नागरिकांमध्ये शासन प्रशासनावरती तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.महामार्गावरील खड्डे तात्काळ बुजवावे यासाठी एक युवकाने महामार्गावरील खड्ड्यात धान लावून शासन प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्याचबरोबर महामार्गावरील दुचाकी धारक व इतर प्रवासी वर्गाकडून सदर खड्डे तात्काळ बुजवावे, अशी मागणी केली जात आहे.

**तात्काळ खड्डे बाजवा अन्यथा ठिय्या आंदोलन आंदोलन**
डोणगाव येथून छत्रपती संभाजी नगर ते नागपूर गेलेल्या महामार्गावर पडले गेलेल्या महामार्गावरील खड्डे तात्काळ बुजवावे व नागरिकांना होणारा त्रास दूर करावा नागरिकांचा प्रवास सुखकर करावा व राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजविण्याबरोबरच प्रवाशांना इतर सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्या.अन्यथा विभाग कार्यालयाला समोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र स्वरूपाचे ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी इशारा दिला आहे.




दैनिक आपला विदर्भ

डोणगाव/प्रतिनिधी : छत्रपती संभाजीनगर ते मुंबई महामार्गावर जीवघेणा खड्डा पडल्यामुळे वाहनधारकांचे अपघात घडत आहेत. सदर खड्ड्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने वाहनधारकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.याकडे संबंधीत विभागाने लक्ष देऊन सदर खड्डा तात्काळ बुजवावा, अशी मागणी वाहनधारकांकडून होत आहे.
छत्रपती संभाजीनगर महामार्गावर डोणगाव जवळ भलामोठा खड्डा पडल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. सदर मार्ग हा महामार्ग असल्याने या मार्गावरील वाहने हे भरधाव वेगाने असतात. भरधाव असणाऱ्या वाहनचालकांला सदर खड्डा जवळ येईपर्यंत दिसत नसल्याने या खड्ड्यात वाहन आदळून अपघात घडत आहे.
काही सुज्ञ नागरिकांना सदर खड्ड्यामुळे अपघात होऊ नये,यासाठी खड्ड्यामध्ये लाकूड रोवून वाहनधारकांना सतर्क केले जात आहे. छत्रपती संभाजीनगर ते मुंबई महामार्गावर असल्याने या मार्गावरून रुग्ण तसेच अधिकारी, पदाधिकारी तसेच इतर नागरिकांना छत्रपती संभाजीनगर, मुंबई, जालना आदी ठिकाणी जावे लागते. रात्रीच्या वेळेस सदर वाहनधारकांना जावे लागते.भरधाव वाहनचालकांना सदर खड्डा जवळ येईपर्यंत दिसत नसल्याने या खड्ड्यात वाहन आदळून अपघात घडत आहेत.
दुचाकीधारकांचे या खड्ड्यामुळे अनेक अपघात घडले आहेत. तसेच दरदिवशी दुचाकीधारक व कार यासह इतर वाहनांचे अपघात घडत आहेत. प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष असल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष

### गोपाल आखाडे यांनी दिला होता आंदोलनाचा इशारा

छत्रपती संभाजीनगर महामार्गावर डोणगाव जवळ पडलेल्या खड्ड्यांनी नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत होता. तर दरदिवशी या खड्ड्यांमुळे अपघात घडत होता. त्यामुळे झोपी गेलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी खड्ड्यात सुद्धा आंदोलनाचा इशारा दिला होता.राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी आंदोलनाचा इशारा देताच झोपेचे सोंग घेतलेल्या प्रशासनाला जाग आली असून सदर खड्डा बुजविण्यात आला आहे.तसेच सदर खड्डा बुजविण्यासाठी नागरिकांच्या वतीने खड्ड्यात धान लागवड करून प्रशासनाचा निषेध करण्यात आला होता.

## विविध वृत्त...

### नागपूरमध्ये खासगी कार्यक्रमात नितीन गडकरी यांचे स्पष्ट मत 'रोजगार वाढवणे हीच खरी प्राथमिकता'




दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरमधील एका खाजगी कार्यक्रमात बोलताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी गांधी आणि नेहरूंचे उदाहरण देत सांगितले की पंडित जवाहरलाल नेहरू नेहमीच म्हणायचे की अधिक उत्पादन झाले पाहिजे. तेच महात्मा गांधी म्हणायचे की अधिक उत्पादनासोबतच लोकांना अधिकाधिक रोजगार मिळाला पाहिजे.

रोजगार निर्माण करणे ही आपली पहिली प्राथमिकता आहे. येत्या काळात जर यशस्वी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रोजगार वाढवे गरजेचे आहे. याबरोबर विदर्भातील निर्यात वाढवण्याची गरज आहे. जर विदर्भ समृद्ध झाला तर महाराष्ट्र समृद्ध होईल आणि मग भारत समृद्ध होईल. पंतप्रधानांचे आत्मनिर्भर भारताचे ५ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेचे स्वप्न निश्चितच पूर्ण होईल.


### क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज तहसीलदार विजय सवडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार प्रमोद करे, संजय बंगाळे, जिल्हा नाझर गजानन मोतेकर यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना बॉम्बने उडवण्याची धमकी; संशयित आरोपी अटकेत



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या घरी बॉम्ब ठेवण्यात आला असून तो फुटणार आहे अशी धमकी देणारा कॉल पोलिसांच्या कंट्रोल रूम ला आला. पोलिसांनी लगेच तपास सुरू केला केला आणि आरोपीला अटक केली. उमेश राऊत अस कॉल करणाऱ्या आरोपीचे नाव असून तो मेडिकल परिसरातील देशी दारूच्या दुकानात नोकरी करतो. तो आपल्या एका मित्रासोबत कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीत भाड्याने राहतो. धमकी चा कॉल येताच पोलिसांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सेक्युरिटी ला याची माहिती दिली, आणि बिडीडीएस पथकाच्या त्यांच्या दोन्ही घरी पोहचले मात्र दोन्ही ठिकाणी काहीच मिळून आलं नाही

पोलिसांनी आता त्याची चौकशी सुरू केली असून त्याने असा धमकीचा कॉल का केला याचा शोध घेत आहे. आरोपीचा जुना गुन्हेगारी रेकॉर्ड नसल्याचं सुद्धा पोलिसांच्या तपासात पुढे आलं. पोलीस आता त्याच्या सोबत राहणाऱ्या मित्राची सुद्धा विचारपूस करत आहे.

### महादेवी हत्तीणीला परत आणण्यासाठी नांदणी ते कोल्हापूर निघाली भव्य पदयात्रा

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी येथील सुप्रसिद्ध मठातील महादेवी हत्तीण गुजरातच्या वनतारा येथे पाठवल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड रोष पाहायला मिळत आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधी महादेवी हत्तीण कोल्हापूरला परत आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्यातच १००८ भगवान महावीर जयंती उत्सव समिती इचलकरंजी आणि सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने जोरदार निषेध व्यक्त करत नांदणी ते कोल्हापूर अशी विशाल पदयात्रा काढण्यात आली आहे. माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली रविवारी पहाटे ५ वाजता ही पदयात्रा सुरू झाली आहे. अखेरीस जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे या यात्रेचा समारोप होणार आहे.



# दापोलीतून एक राखी जवानांसाठी अभियानाअंतर्गत सीमेवर राख्या रवाना!

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** कै.कृष्णामामा महाजन स्मृतिप्रतिष्ठानच्या युवा प्रेरणा कट्टा टीमने दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील दापोलीत एक राखी जवानांसाठी; देशाच्या रक्षकांसाठी हा उपक्रम आयोजित केला होता. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर ज्या भारतीय सैन्य दलानी पहलगाम हल्ल्याचा बदला घेत पाकिस्तानी आंतकवाद्यांना धडा शिकवला त्यांच्या प्रति आदर व्यक्त करणे हा यावर्षीच्या अभियानाचा मुख्य उद्देश होता.



दापोलीतील विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थिनी आणि काही सामान्य नागरिक महिला भगिनी यांनी या उपक्रमात राख्या जमा केल्या. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमोद पांगारकर,नचिकेत बेहरे,संदीप गरंडे, श्रीप्रीती वैद्य, साक्षी करमरकर, सुमेध करमरकर, रोहन भावे इ. कार्यकर्त्यांसह युवा टीमने मेहनत घेतली.

या उपक्रमाबाबत बोलताना मिहीर महाजन म्हणाले, भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली तेव्हा २०२२ मध्ये प्रथमच या उपक्रमाची सुरुवात आपण करत ७५ हून अधिक शाळा/महाविद्यालयांतून राख्या जमवून सीमेवर पाठवल्या होत्या. तेव्हापासून दरवर्षी हा उपक्रम आयोजित केला जातो. यावर्षी जमलेल्या राख्या पठाणकोट (पंजाब) येथील भारतीय वायू सेनेच्या हवाई तळावरील जवानांना तसेच मुंबई येथील सशस्त्र सेना सामान चिकित्सा डेपो येथील ऑफिस मध्ये देखील रवाना करण्यात आल्या.

# वर्ध्यात मोतीबिंदू शिबिरात पालकमंत्री पंकज भोयर यांची उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी : :** जिल्ह्याच्या कारंजा घाडगे येथे मोतीबिंदू विरहित वर्धा जिल्हा अंतर्गत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला राज्याचे गृहराज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांनी हजेरी लावली. यावेळी पंकज भोयर यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी यावेळी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सभेत ग्रामसेवकला दिलेल्या धमकी, मनसेकडून डान्सबार मध्ये केलेली तोडफोड, जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या पोस्ट संदर्भात व गडकरी यांच्या घराला उडविल्याच्या धमकी संदर्भात वक्तव्य केले. यावेळी ते म्हणाले की, जर का सामान्य लोकांचे काम होत नसेल तर, लोकप्रतिनिधींचे काम आहे. त्या ठिकाणी त्या प्रशासनाच्या अधिकाऱ्याला समज देणे. आणि रोहित पवार जर याचा चुकीचा अर्थ काढत असतील तर हे बरोबर नाही. राज्यामध्ये कुठेही अवैधप्रमाणे डान्सबार किंवा इतर कुठलीही गोष्ट चालू असेल तर ती खपवून घेतल्या जाणार नाही. परंतु,या पद्धतीने कायदा हातात घेऊन त्यांच्यावर कारवाई करणे हे देखील योग्य नाही. अशा पद्धतीने काही सुरू असेल तर त्याचं तक्रार शासनाकडे द्यावे,प्रशासनाकडे द्यावी प्रशासन निश्चितपणे त्याच्यावर कारवाई करेल. ज्यांनी ज्यांनी कायदा हातात घेतला असेल त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. जितेंद्र आव्हाड हे नेहमी काहीतरी कॉन्ट्रोवर्शियल वक्तव्य करून किंवा पोस्ट करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतात. माझी त्यांना विनंती आहे की आज समाजामध्ये जी शांतता आहे ते टिकून राहण्याकरता अशा पद्धतीची कुठलीही कॉन्ट्रोवर्शियल वक्तव्य करू नये, माहिती घेऊन जर का अशी धमकी देण्यात आली असेल तर प्रशासन त्याच्यावर कारवाई करेल.अशी माहिती यावेळी राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# महादेवी माधुरी हत्ती वापस देण्यासाठी डोणगावात निदर्शने

दैनिक आपला विदर्भ



**डोणगाव/प्रतिनिधी :** कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी मठातील दिगंबर जैन समाजाचे धार्मिक प्रतीक असलेल्या महादेवी माधुरी हतीन कोर्टाच्या आदेशाने गुजरात मध्ये वनतारा प्राणी संग्रहालयात नेण्यात आली आहे. त्यामुळे जैन बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. समस्त जैन बांधवांच्या भावना लक्षात घेता महादेवी माधुरी हत्तीन कोल्हापूर येथील मठात परत द्यावी या मागणीसाठी डोणगाव येथे ३ ऑगस्ट रोजी निदर्शने करण्यात आली.याबाबत डोणगाव पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.तसेच निवेदनाची एक प्रत राष्ट्रपतींना पाठविण्यात आली.

सदर निवेदनात नमूद केले आहे की, कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी मठातील दिगंबर जैन समाजाचे धार्मिक प्रतीक महादेवी माधुरी हत्तीन कोर्टाच्या आदेशाने गुजरात मध्ये वनतारा प्राणी संग्रहालय नेण्यात आली आहे.यामुळे सर्व जैन बांधवांच्या व मंदीरात असता असणाऱ्यांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यामुळे महादेवी माधुरी हत्तीन वापस त्याच मठात देण्यात यावी, या मागणीसाठी ३ ऑगस्ट रोजी डोणगाव ये निदर्शने करण्यात आली.




यावेळी माजी मंत्री सुबोध सावजी,जिल्हा परिषद महिला बालकल्याण माजी सभापती सौ. सायली सावजी, डोणगाव ग्रामपंचायत अध्यक्ष चरण आखाडे, डोणगाव काँग्रेस कमिटी अध्यक्ष विष्णू पळसकर, दिगंबर जैन समाज अध्यक्ष मधु बोराळकर व सर्व पदाधिकारी यांनी डोणगाव जैन समाज माता भगिनी व पुरुषांसह माधुरी हत्तीन वापस मिळालीच पाहिजे या मागणी करता डोणगाव येथे निदर्शने केली. सदर निदर्शनात हजारो महिला पुरुष सहभागी झाले होते.

# रणजित झोंबाडे यांची मनसे कामगार सेना यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी निवड

**दारव्हा/प्रतिनिधी :** मनसेचे माजी तालुकाध्यक्ष रणजित झोंबाडे यांची मनसे कामगार सेना यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाशी निष्ठावान व सक्रिय कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख असून त्यांच्या नियुक्तीचे मनसैनिकांत स्वागत होत आहे.



यवतमाळ येथील विश्रामगृहात पार पडलेल्या बैठकीत मनसेचे जिल्हाध्यक्ष देवा शिवरामवार यांच्या हस्ते झोंबाडे यांची अधिकृत निवड जाहीर करण्यांत आली. यावेळी मनसेचे अनिल हमदापुरे, दारव्हा तालुकाध्यक्ष लाला पांडे, शहराध्यक्ष राम गायकवाड, ईश्वर राठोड, शैलेश घाटे, रणजित चव्हाण, नागोराव चव्हाण,राजु इंगोले, सचिन ठाकरे, वसंत गायकवाड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर झोंबाडे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे व मनसे नेते राजु उंबरकर, आनंद एंबडवार व जिल्हा नेतृत्वाचे आभार मानत, कामगारांच्या प्रश्नांसाठी लढा देण्याचे आश्वासन दिले.

# बार्शीटाकळी तहसील कार्यालयाच्या वतीने पिंजर येथे महसूल दिन साजरा

## पिंजर येथे दिवाळी साजरी : गोरगरिबांना मिळाला न्याय, अतिक्रम धारकांना नियमाकूल करून आठ वाटप

दैनिक आपला विदर्भ

**बार्शीटाकळी/प्रतिनिधी :** तालुक्यातील पिंजर येथील भाऊसाहेब लहाने कॉलेज येथे आयोजित महसूलन दिन कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी संदीप कुमार अपार यांच्या आदेशावरून तहसीलदार राजेश वजीरे, बार्शीटाकळी पंचायत समितीचे बीडीओ रविकांत पवार यांच्या वतीने पिंजर येथील ३० वर्षापासून प्रतीक्षेत असलेले लाभार्थ्यांना न्याय मिळाला आहे.विशेष म्हणजे अकोला जिल्ह्यातून पिंजर येथे सर्वात जास्त अतिक्रम नियमाकुल करण्यात आले आहे.





शासनाच्या निर्णयानुसार महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या या सेवा आणि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ देता यावा तसेच त्याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता वाढवावी शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबदल नागरिकाचा विश्वास वृध्दीगत व्हावा यासाठी दि, १ ते ७ ऑगस्ट महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताह अंतर्गत २ ऑगस्ट रोजी महसूल दिनानिमित्त पिंजर येथे नागरिकांना दैनंदिनी रित्या निर्गमित येणारे अतिक्रमण नियमाकुलीत करून पात्र असलेल्या कुटुंबास अतिक्रमित जागेचे पट्टेवाटप, नमुना नं, ८ वाटप मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अनिता मेश्राम जिल्हा परिषद अकोला, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, तहसीलदार राजेश वझीरे,गटविकास अधिकारी रविकांत पवार, मंडळाधिकारी श्रावण भराडी,ग्राम महसूल अधिकारी राजेश धामणीकर, मनिष हळदे, सुनिल गायगोळ, सतीश चोथमल, राहुल चव्हाण,पिंजर ग्रामपंचायत चे सरपंच सौ.शारदा पांडुरंग ठक, उपसरपंच शेख वसीम शेख पीरमोहम्मद , ग्रामपंचायत अधिकारी विजय नवलकर,उप तालुका प्रमुख शिवसेना पांडुरंग ठक, शिवसेना नेते संजय मानतकर भाजप नेते राजू पाटील काकड, तालुका अध्यक्ष गोपाल महल्ले, तालुका अध्यक्ष संकेत राठोड पिंटू पाटील ठाकरे,अशोक लोणाग्रे व सर्व ग्रामपंचायत सदस्य, गावकरी तसेच सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.